**<u>नियमित दिवाणी दावा क्र.४१०/२०१५ मधील निशाणी क्रमांक ८२ खालील आदेश</u>**

**निवृत्ती रामचंद्र ताके व इतर ... वादीं.**

**<u>विरुध्द</u>**

**येनुबाई बबन ताके व इतर ... प्रतिवादीं.**

वादीने प्रस्तुतच्या अर्जात दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ चे ऑर्डर ६ रुल १७ प्रमाणे दावा दुरुस्तीसाठी केला आहे. त्यांचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र.१ ते ११ यांनी नि.क्र.७२ वर काऊंटर क्लेम दाखल केलेला असुन काऊंटर क्लेम मधील काऊंटर वादी क्र.१ येनुबाई बबन ताके हया दि.०१.०९.२०२० रोजी मयत झाले. मयत काऊंटर वादीस काऊंटर वादी नं.२-अ ते २-इ तसेच काऊंटर वादी नं.३ व ४ वारस आहे. तसेच काऊंटर क्लेम मधील प्रतिवादी क्र.४ आसराबाई सखाराम काळे हया देखील दि.१५.०१.२०२१ रोजी मयत झाले. मयत काऊंटर प्रतिवादी क्र.४ हिस काऊंटर प्रतिवादी क्र.३ व ५ हे वारस आहे. वरील मयत काऊंटर वादीचे वारसांची नावे काऊंटर क्लेम मध्ये सामाविष्ट असल्याने, मयताचे वारसांना पुन्हा नव्याने रेकॉर्डवर घेण्याची आवश्यकता नाही फक्त मयत काऊंटर वादी नं.१ व प्रतिवादी क्र.४ यांचे नावे काऊंटर क्लेम मधुन कमी करण्यासाठी वादी यांनी सदरचा अर्ज दाखल केला आहे. प्रतिवादींनी सदर अर्जास हरकत घेतली असुन दुरुस्तीस जास्ती जास्त कॉस्ट करण्याची विनंती केली आहे.

२. वादी व प्रतिवादी यांची कथने आणि उभयपक्षाच्या युक्तीवादावरुन अर्जाच्या निष्कर्षाकरीता खालील मुद्दे उपस्थित होत आहेत. खाली दिलेल्या कारणांस्तव यांचे निष्कर्ष नोंदविलेले आहेत.

| | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | उभय पक्षामध्ये वादाच्या मुख्य मुददयाचा गुणांवगुणावर | ...होय. |

| | | |
|---|---|---|
| | निष्कर्ष देण्याकरीता प्रस्तुत दुरुस्ती आवश्यक आहे काय ? | |
| २. | आदेश काय ? | आदेश मंजुर. |

३. वादी यांनी प्रस्तुत दावा हा कायदयाप्रमाणे वाटप होऊन त्यांचा हिस्याचे विभक्त ताबा मिळण्या करीता दाखल केलेला आहे. तसेच प्रस्तुत दाव्यात मयत काउंटर वादी क्र.१ येणुबाई बबन ताके व मयत काउंटर प्रतिवादी क्र.४ आसराबाई सखाराम काळे यांचे वारसांची नावे काउंटर क्लेम मध्ये समाविष्ठ असलेल्या फक्त मयत काउंटर वादी क्र.१ व काउंटर प्रतिवादी क्र.४ यांची नावे काउंटर क्लेम मधुन कमी करण्याची मागणी केलेला आहे. दोन्ही पक्षास ही बाब मान्य आहे की, प्रतिवादी क्र.१ येनुबाई बबन ताके हया दि.०१.०९.२०२० रोजी मयत झाले असुन मयत प्रतिवादीस प्रतिवादी क्र.२–अ ते २–इ तसेच प्रतिवादी क्र.३ व ४ वारस आहेत. तसेच प्रतिवादी क्र.४ आसराबाई सखाराम काळे हया दि.१५.०१.२०२१ रोजी मयत झाले असुन प्रतिवादीस प्रतिवादी क्र.३ व ५ हे वारस आहे. त्यामुळे प्रतिवादी यांनी अर्जास हरकत घेतलेली असली तरी उभय पक्षामध्ये जो वादातील प्रश्न आहे त्याचा गुणांवगुणावर निर्णय देण्याकरीता प्रस्तुत दुरुस्ती ही आवश्यक आहे. दाव्यामध्ये वाद मुद्दे निश्चित केलेले नसुन आज पावेतो कुठल्याही पक्षाने पुरावा सादर केलेला नाही. त्यामुळे प्रस्तुत दुरुस्ती करण्यास वादी यांना मंजुरी दिल्यास प्रतिवादी यांचे नुकसान होणार नाही. म्हणुन या मुद्दयाकरीता होकारार्थी निष्कर्ष नोंदवुन मुद्दा क्र.२ च्या निष्कर्षाकरीता खालील आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. वादीने निर्धारीत वेळेत दुरुस्ती करावी.

27/11/21

**(श्रीमती आर. एन. मर्क)**
दिवाणी न्यायाधीश व.स्तर,
वैजापुर.

दिनांक – २७/११/२०२१.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file of Order is same word to word as per the original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Prashantkumar N. Waghamare.<br>Stenographer |
| Court | : | Smt. R. N. Merck.<br>Civil Judge (S.D.), Vaijapur. |
| Date | : | 27.11.2021. |
| Order signed by<br>the presiding officer on | : | 27.11.2021. |
| Order uploaded on | : | 27.11.2021. |